# पुण्य नगरी

# साहित्य अकादमीतर्फे चांदाळा येथे 'ग्रामालोक' कार्यक्रम

**गडचिरोली :** नवी दिल्ली येथील साहित्य अकादमीने चांदाळा येथील माध्यमिक आश्रमशाळेत 'ग्रामालोक'कार्यक्रमाचे आयोजन शनिवार ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमात गडचिरोली जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरातील नाटककार आणि आदिवासी साहित्यिक आपले सादरीकरण करणार आहेत.

ग्रामीण परिसरातील लोककला, लोकजीवन आणि साहित्यांना व्यासपीठ मिळावे, यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाअंतर्गत 'ग्रामालोक'कार्यक्रमाचे ग्रामीण भागात आयोजन केले जात असते. चांदाळा येथील 'ग्रामालोक'कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झाडीपट्टीचे सुप्रसिद्ध लेखक व कलावंत नवरगाव येथील प्राचार्य सदानंद बोरकर, तसेच गडचिरोली येथील सुप्रसिद्ध नाटककार चुडाराम बल्लारपुरे आणि एटापल्ली ता. कुरखेडा नाटककार विश्वंभर गहाणे आपल्या नाट्यनिर्मितीचे अनुभव कथन करणार आहेत. कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आदिवासी कवयित्री व कार्यकर्त्या कुसुम अलाम आदिवासी साहित्य व संस्कृतीबद्दल मार्गदर्शन करणार असून, पुराडा येथील लेखिका संगीता ठलाल या झाडीपट्टीतील रानभाजी व वनौषधीबद्दल आपले अनुभव कथन करणार आहेत. कार्यक्रमाला साहित्य अकादमी, नवी दिल्लीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित राहणार असून चांदाळा आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका यशोधरा उसेंडी या आभार प्रदर्शन करणार आहेत. नागरिकांनी 'ग्रामालोक'कार्यक्रमाला उपस्थित राहून आस्वाद घेण्याचे आवाहन संयोजक सतीश पवार यांनी केले आहे.

Gadchiroli Edition
Aug 22, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com